# 'जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधील जातीनिर्मूलन विषयक विचार'

**शैलजा पाटील** – संशोधक विद्यार्थी , **डॉ. ओमप्रकाश कलमे** – प्रपाठक वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर .

**प्रस्तावना :**संज्ञापनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविल्या जाणाऱ्या माहितीचे रूपांतर आपल्या अनुभवात होत असते आणि यातूनच 'स्व-अनुभूती'ची निर्मिती होते. ज्येष्ठ पत्रकार जगन फडणीस यांनीही आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून लोकांना मिळालेल्या माहितीचे रूपांतर अनुभवात करण्याची गरज सतत प्रतिपादित केलेली आहे. लोकांच्या जाणिवा विविध विषयांबाबत अधिक तीव्र करण्याच्या कामीही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या अग्रलेखामधून लोकांना अवती-भवती घडणाऱ्या घटनांचे अंतरंग तर माहित होतातच शिवाय, त्या घटनांपाठीमागील अन्य कारणे, त्यांचे भविष्यातील परिणाम, त्यामागील राजकीय उठाठेवी इ. चे विश्लेषण लोकांना आत्मसात करावयास मिळते. त्यामुळे जगन फडणीस यांनी लोकांना अन्य विषयांबरोबरच सामाजिक बदलाचाही विशेष अनुभव आपल्या लेखनातून दिल्याचे दिसून येते. समतेवर आधारित समाजव्यवस्था आणू पाहणाऱ्या विचारसरणीची रूजवणूक करण्याचा प्रयत्न जगन फडणीस यांनी आपल्या पत्रकारितेमधून केला शिवाय, राष्ट्रऐक्यासाठी सर्वधर्मसमभाव स्वीकारण्याचा आग्रह त्यांच्या लेखनातून झाल्याचे स्पष्ट होते. ज्या धर्मामध्ये आणि ज्या समाजात माणूसकी शिल्लक नाही त्याविषयी प्रेम असण्याचे कारण नाही. जन्माला आल्याबरोबर सुरू होणारी जात मरणानंतरही संपत नाही तो समाज आणि असा समाज असलेला देश मानवांचा असू शकत नाही अशी जातीभेदाविषयी असलेली त्यांची चीड त्यांच्या अग्रलेखांमधून व्यक्त होते. जातीभेदाने पोखरलेल्या अमानवी व असत्य मानवी जीवनाचा संतापजनक दृष्टीकोनाचा प्रत्यय त्यांच्या लिखाणातून येतो. ग्रामीण भागात अजूनही जातीभेद घट्ट मूळ धरून आहे, मागासवर्गीयांविषयी सवर्णांना असलेला तिरस्कार जोपासण्यासाठी व वाढविण्यासाठी होत असलेल्या राजकारणाचा आणि शासकीय धोरणांच्या वापरावर जगन फडणीस यांनी आपल्या अग्रलेखांतून टीका केल्याचे दिसून येते. सामाजिक समानता जोपासली न गेल्यास, समाजामध्ये सामाजिक विषमतेची दरी वाढून अराजक माजेल ही जाणीव करून देण्याचे काम जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधून झाल्याचे स्पष्ट होते. जगन फडणीस यांनी आपल्या अग्रलेखांमधून दलित व मागासवर्गीयांवर केल्या जाणाऱ्या छळ, अन्यायाच्या हिंसक कृतींचा निषेध केल्याचे दिसून येते लोकशाहीवादी मूल्यांच्या आधारे सामाजिक समता स्थापित करण्यासाठी लोकांची सद्सद्विवेकबुद्धी जागृत करण्याचे काम जगन फडणीस यांनी आपल्या अग्रलेख लेखनातून केल्याचे दिसून येते. जगन फडणीस यांनी आपल्या पत्रकारितेतून जातीभेद, धर्मभेद यांना कारणीभूत ठरणाऱ्या धर्मांध राजकारणाला विरोध केल्याचेही निदर्शनास येते. लोकशाहीनिष्ठेच्या आधारावर सामाजिक बदलांच्या अपेक्षेतून जगन फडणीस यांनी आपल्या पत्रकारितेमधून जातीनिर्मूलनाचा पुरस्कार केल्याचे स्पष्ट होते.

**<u>जगन फडणीस यांच्या पत्रकरितेमधील जातीनिर्मूलन विषयक विचार.</u>**

**<u>प्रस्तावना</u>:-सामाजिक बदलासाठी आवश्यक असणारी गती 'मानवी संस्कृती' मधून मिळत असते. अशा संस्कृतीची देवाण - घेवाण करण्याचे काम संज्ञापन करते. संज्ञापनाद्वारा संस्कृतीची आणि नवविचारांची निर्मिती होत असते, त्यामुळे संज्ञापन या सतत बदलणाऱ्या आणि सतत चालु राहणाऱ्या प्रक्रियेचा अनुभव ज्येष्ठ पत्रकार जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधून येतो. जगन फडणीस यांनी विविध पुस्तके, संदर्भग्रंथ, महत्वाच्या घटना, अहवाल, प्रत्यक्ष मुलाखती, चर्चा, टिपणे, वृत्तपत्रे इ. स्त्रोतांच्या माध्यमातून स्वत:चे नवीन विचार, कल्पना आणि मते तयार केली. जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधून संज्ञापनाद्वारा निर्माण झालेले नव-विचार हे 'सामाजिक बदल' घडवून आणण्यासाठीच्या ध्येयातून साकारलेले दिसून येतात. किंबहुना, 'सामाजिक बदल' घडून यावेत या 'आशावादा' वर ते आधारलेले असल्याचे स्पष्ट होते. हा आशावाद जगन फडणीस यांनी आपल्या जातीनिर्मुन विषयक विचारांच्या माध्यमातून जनमाणसांमध्ये जागृत करण्याचा प्रयत्न त्यांच्या पत्रकारितेमधून केल्याचे दिसून येते. संज्ञापनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविल्या जाणाऱ्या माहितीचे रूपांतर आपल्या अनुभवात होत असतं, आणि यातूनच 'स्व-अनुभूती' ची निर्मिती होते. ज्येष्ठ पत्रकार जगन फडणीस यांनीही आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून लोकांना मिळालेल्या माहितेचे रूपांतर अनुभवात करण्याची गरज सतत प्रतिपादित केलेली आहे. लोकांच्या जाणिवा विविध विषयांबाबत अधिक तीव्र करण्याच्या कामीही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या अग्रलेखांमधून लोकांना अवती-भवती घडणाऱ्या घटनांचे अंतरंग तर माहित होतातच शिवाय, त्या घटनांपाठीमागील अन्य कारणे, त्यांचे भविष्यातील परिणाम, त्यांमागील राजकीय उठाठेवी इ. चे विश्लेषण लोकांना आत्मसात करावयास मिळते हे विशेष. याच कारणामुळे जगन फडणीस यांनी अन्य विषयांबरोबरच सामाजिक बदलाचाही विशेष अनुभव आपल्या लेखनातून दिल्याचे दिसून येते.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, स्वातंाय, समता आणि बंधुता या त्रिसुत्रींवर आधारित समाज हा आदर्श समाज आहे. या आदर्श समाजामध्ये, एका भागात होणारा बदल दुसऱ्या भागात माहिती होण्याकरिता संसाधने उपलब्ध असतात. यामुळे दोन घटकांतील संवाद वाढण्यास मदत होइन, बंधुतेचा विकास होतो आाणि यालाच 'लोकशाही' म्हणतात. शिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गांचा बनलेला असतो आणि म्हणूनच साऱ्या वर्गांना प्रतिनिधीत्व असावे जेणेकरून स्वातंाय, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल असा त्यांचा आग्रह होता. यांस अनुसरून, जगन फडणीस यांनी आपल्या पत्रकारितेद्वारा न्याय, स्वातंाय, समता, बंधुता धर्मनिरपेक्षता या लोकशाहीमुल्यांचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. त्यांनी जातीनिर्मुलनविषयक विचारांच्या माध्यमातून, समतेवर आधारित समाजव्यवस्था आणू पाहणाऱ्या विचारसरणीची रूजवणूक करण्याचा प्रयत्न आपल्या पत्रकारितेमधून केला. शिवाय, राष्ट्रऐक्यासाठी सर्वधर्मसमभाव स्वीकारण्याचा आग्रह त्यांच्या लेखनातून झाल्याचे स्पष्ट होते.**

**<u>संशोधनपद्धती</u>:-' जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधील जातीनिर्मुलनविषयक विचार' या संशोधनासाठी 'गुणात्मक संशोधन पद्धतीचा' वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन विषयातील मजकुराचे मुल्यमापन आणि परिक्षण करण्यात आले आहे. या संशोधनासाठी प्राथमिक साधनांचा वापर केला आहे.प्राथमिक साधनांमध्ये, जगन फडणीस यांनी पत्रकारिता केलेली वृत्तपत्रे यांचा विशेष वापर करण्यात आला आहे, प्रामुख्याने या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखांचा अभ्यास केला आहे.**

**<u>उद्दिष्टे</u>:-१ द्धजगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधील जातीनिर्मुलनविषयक आशयाचे विश्लेषण करणे.**

**२ द्धजगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधील जातीनिर्मुलनास चालना देणाऱ्या मुल्यांचा अभ्यास करणे.**

**जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधील जातीनिर्मुलनविषयक विचार: लोकशाहीनिष्ठेच्या आधारावर सामाजिक बदलांच्या अपेक्षेतून जगन फडणीस यांनी पत्रकारिता करीत असताना, विशेषकरून आपल्या अग्रलेखांमधून जातीनिर्मुलनावर पुरस्कार केल्याचे दिसून येते. अशा अग्रलेखांद्वारा सामाजिक समतेच्या आधारावर सुजाण समाज निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये जगन फडणीस यांनी जातीनिर्मुलन विषयक विचारांचे मुल्यात्मक योगदान दिल्याचे स्पष्ट होते.जातीभेद हा समाजाला कलंक आहे. जातीभेद, विषमतेचे विदारक वास्तव वाचकांसमोर ठेवणारा 'संतांची भूमी की सैतानांची? हा जगन फडणीस यांचा अग्रलेख महत्वपूर्ण आहे. या अग्रलेखाच्या शिर्षकावरूनच जगन फडणीस यांना जातीभेदाविषयी असलेली चीड व्यक्त होते.**

मराठवाडयातील परभणी जिल्हयात हनुमानाच्या मंदिरात अंबादास सावणे या दलित व्यक्तीने प्रवेश केला म्हणून त्याला भक्तांनी ठेचून मारले म्हणूनच, जगन फडणीस यांना प्रश्न पडतो की, एकेकाळी संतांची भूमी असलेला मराठवाडा आता सैतानाची भूमी बनली आहे का? जगन फडणीस लिहितात - ''ज्या धर्मात आणि ज्या समाजात माणुसकी शिल्लक नाही त्याविषयी प्रेम का वाटावे?'' ते संतापजनक प्रश्न उपस्थित करतात की, ''जन्माला आल्याबरोबर सुरू होणारी जात मरणानंतरही संपत नाही तो समाज आणि असा समाज असलेला देश मानवांचा आहे असे का म्हणावयाचे?'' वाचकांच्या सद्सद्विवेकबुद्धीला जागे करण्याचे काम या अग्रलेखातील प्रश्नांनी केले आहे. माणुसकी आणि प्रेम नसणाऱ्या धर्मावर व समाजावर जगन फडणीस यांनी टीका केली आहे.

''हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदु म्हणून मी मरणार नाही'' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. हिंदु धर्म हा विषमतेवर व शोषणावर आधारलेला आहे अशा धर्मात राहून सामाजिक समता, बंधुता व स्वातंत्र्य, मिळणार नाही. हिंदु धर्माला एक गोष्ट मात्र कदापी सहन झाली नाही ती म्हणजे समतेची संकल्पना! असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. या विचारसरणीचा पुरस्कार करीत, जगन फडणीस यांनी डॉ. आंबेडकरांशी संबंध काय? या अग्रलेखाद्वारा, हिंदुत्ववाद जोपासणाऱ्या रा.स्व.संघ व भाजप यांच्या हिंदुत्ववादी धारणावर टीका केली आहे. या संदर्भात जगन फडणीस लिहितात -''ज्या हिंदु धर्माचे तत्त्वज्ञान बदलले नाही त्यात प्राचीन तत्त्वज्ञानाचा अभिमान बाळगला जातो अशा हिंदु धर्माच्या रक्षणाचे कार्य रा.स्व. संघाने आपल्या स्थापनेपासून हातात घेतले आहे. भाजपनेही 'हिंदुत्ववाद' जोपासण्याचे व्रत स्विकारले आहे. हिंदुत्वाच्या धोरणांचा स्वीकार करण्यात आमची चूक झाली आहे, अशी जाहीर कबुली जोपर्यंत रा.स्व.संघ व भाजप देत नाही तोपर्यंत त्याचे तत्त्वज्ञान हिंदुत्ववादाचेच आहे आणि 'हिंदु धर्मात समतेला स्थान नाही' या कारणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु धर्माचा त्याग केला. ''हिंदु संस्कृतीचा मुळातच काही तरी प्रचंड दोष आहे'' असे डॉ. आंबेडकर म्हणाले होते. संघ -भाजपला हे विधान मान्य आहे काय? हे विधान मान्य असेल तर मग दोन्ही संघटनांना हिंदुत्वाचा आग्रह कसा धर ता येईल? तो आग्रह त्यांनी सोडून दयावा'' प्रस्तुत अग्रलेखाद्वारा जगन फडणीस यांनी आपल्या देशाला हिंदुमधील विनाशकारक जातीप्रथेमुळे वारंवार स्वातंत्र्य गमवावे लागले या डॉ. आंबेडकरांच्या मताचा दाखला देइन, संघ-भाजपने असे ठामपणे सांगितले आहे.

'चातुर्वर्ण्याची चौकट' या अग्रलेखाद्वारा जगन फडणीस यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर फडाडून टीका केली आहे. वेदांमध्ये आणि शास्त्रांमध्ये सांगितलेला हिंदु धर्म म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून यज्ञासंबंधीच्या व सामाजिक आणि राजकीय विषयाच्या निरर्थक नियमांचे जडणंवाल आहे. असा कुजका इमला जमीनदोस्त करायला पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. हिंदु धर्मातील जातीव्यवस्थेसंदर्भात जगन फडणीस लिहितात- ''जातीव्यवस्था तोडावयाची असेल तर, वर्णव्यवस्थाच मोडीत काढण्याचह गरज आहे. जातीव्यवस्थेमध्ये दलित शिक्षकाला 'ब्राम्हण' म्हटले म्हणून काही त्याला वरचे स्थान मिळणार नाही. या व्यवस्थेमध्ये कोणी कोणाच्या पोटी जन्म घेतला यालाच महत्त्व राहणार आहे. 'ब्राम्हण' हे श्रेष्ठत्वाचे लक्षण मानले आहे ही श्रेष्ठत्वाची भूमिका कायम ठेवून सामाजिक न्यायावर आधारित समाजव्यवस्था अस्तित्वात येणार नाही. हिंदु धर्माची उभारणीच जातीवर आधारित आहे. गीता-उपनिषद यामध्ये एका विश्वाची कल्पना मांडली आहे पण हिंदु समाजाची विभागणी जाती-जातींमध्ये केली आहे. उच्च जातींचे हितसंबंध खालच्या जातींच्या शोषणातून प्रस्थापित झाले आहेत.'' सामाजिक समतेचा आग्रह धरीत, जगन फडणीस यांनी दलित-मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये राखीव जागा देण्याशिवाय मार्ग नाही असे मत व्यक्त केले आहे यासंदर्भात ते लिहितात-''घटनेने सामाजिक, आर्थिक न्याय व सामाजिक समता स्थापन करण्याची उद्घोषणा केली आहे. त्याची परिपुर्ती करावयाची झाल्यास दलित-मागासवर्गीय यांचा सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा घालविण्यासाठी त्यांना नोकऱ्यांत राखीव जागा देण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. हा समतेचा विचार आहे. समतेसाठी राखीव जागांचे तत्त्व स्वीकारण्यात आले आहे. 'समता' या लोकशाही मुल्यास केंद्रस्थानी ठेवून जातीनिर्मुलनाचा ठाम विचार जगन फडणीस यांनी मांडला आहे.शासकीय पातळीवरही दलित-मागासवर्गीयांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेतली जात नाही. यासंदर्भातील देशामध्ये घडणाऱ्या विसंगत घटनांचे विश्लेषण 'कुम्हेरच्या किंकाळया' या अग्रलेखामध्ये जगन फडणीस यांनी केले आहे. तत्कालीन राष्ट्रपती पदाच्या निवडीसाठी मागासवर्गीय राष्ट्रपती असावा असा आग्रह धरला जात होता याचवेळी राजस्थानमधील कुम्हेर या गावी 'जातव' या मागासवर्गीय लोकांचे चौदा शिरकाण करण्यात आले या प्रचंड विसंगतीस अनुसरून जगन फडणीस लिहितात- ''मागासवर्गीयांना कंठस्नान घालावयाचे आणि मागासवर्गीय राष्ट्रपती असावा याचा आग्रह धरावयाचा ही केवढी विसंगती आहे! नुसती मानाची खुर्ची, सन्मानाचे बेगडी एखादे पद आम्हाला नको, आम्हाला किमान इज्जतीने सन्मानाने पण आमचा हक्क म्हणून आम्हाला जगू दया असा टाहो हा मागासवर्ग फोडत आहे. राष्ट्रपती पदाच्या उमेद्वारासंबंधाच्या चर्चेमुळे कुम्हेरच्या हरिजनांच्या करून किंकाळया देशाला ऐकू येत नाहीत! हरिजनांच्या हत्याकांडात पोलिससुद्धा सामील असताना त्याविरूद्धचा आवाज दडपला जातो. ही विसंगती विसरून दलित-मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी जाहीर केलेल्या शासकीय योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जात नसल्याची खंत जगन फडणीस यांनी 'कागदी घोडे' या अग्रलेखाद्वारा व्यक्त केली आहे. यासंदर्भात जगन फडणीस लिहितात-''दलित, इतर मागासवर्गीय यांच्या विरोधात जाणाऱ्या निर्णयांची अंमलबजावणी सवर्णांचा भरणा असलेली नोकरशाही करते! ज्यावेळी, दलितांच्या योजना जाहीर केल्या जातात त्यावेळी त्यांचे स्वागत होते आणि बहुसंख्य लोक 'दलित वर्गाना उद्देशून' सरकारच्या जावयांसाठी कसा पैसा खर्च केला जातो पाहा! टसे कुत्सितपणे म्हणत असतात पण ही दलितांच्या डोळयात केलेली धुळफेक आहे! तुमच्यासाठी या योजना आखल्या त्यासाठी पैसा राखून ठेवला आहे असे सांगितले जाते. पण या योजनांची अंमलबजावणीच होत नसल्यामुळे दलित कल्याणांच्या योजनांचे फक्त कागदी घोडे नाचविले जातात! अशा कागदी घोडयामुळे दलित आपला दर्जा वाढवून सवर्णांच्या बरोबरीने येऊन त्यांच्या बरोबरची शर्यत जिंकतील हे शक्यच नाही'' दलित-मागासवर्गीयांच्या विकासासाठीच्या योजना अंमलात न येता त्या कागदावरच राहून जातात याची स्पष्टोक्ती जगन फडणीस यांनी दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये नमूद केलेल्या मुल्यांवर आधारित असलेला समाज हा अजुनही निर्माण झालेला नाही त्यांच्या कल्पनेतील समाज हा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या घटनेच्या मसुदयाचाही विचार केला जात नाही. हा विचार, जगन फडणीस यांनी 'बाबासाहेबांची खंत' या अग्रलेखामध्ये पुढे नेला आहे. ते लिहितात-''लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती-जमातींना मंत्रिमंडळातही जागा राखून ठेवण्याची तरतूद डॉ. आंबेडकर यांनी आपल्या घटनेच्या मसुदयात केलेली होती. राज्य व केंद्र सरकारात त्यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवल्या पाहिजेत असे म्हटले होते. अल्पसंख्य समाजापेक्षाही अस्पृश्यांना वाईट तऱ्हेने वागविले जाते म्हणून अस्पृश्यांनाही अल्पसंख्य मानले जावे. सत्तेमध्ये अल्पसंख्यांकांनी वाटा मागितला की त्याला 'जातीयवाद' संबोधले जाते आणि बहुसंख्यांकांनी संपूर्ण सत्ता हडपली तरी त्याला 'राष्ट्रीयता' समजली जाते.'' अस्पृश्यांना संरक्षण का मिळाले पाहिजे हे स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचा दाखला दिला आहे.धर्मवादी संघटनांकडे सत्ता येईल तेव्हा कनिष्ठ मानलेल्या जातीवर अत्याचार करणाऱ्या प्रवृत्ती फोफावतील. त्या निढीवलेल्या बनून दलितांबाबत अधिक आक्रमक बनतील असा इशारा जगन फडणीस यांनी 'जाती श्रेष्ठतव आणि क्रुरता' या अग्रलेखामधून दिला आहे. यासाठी त्यांनी, दलित बालिकेने सवर्णांसाठी ठेवलेल्या पिण्याच्या पाण्याच्या भांडयातील पाणी पिले व यासाठी शिक्षकाने तिचे डोळे फोडले या तामिळनाडूमध्ये

घडलेल्या तत्कालीन घटनेचा दाखला दिला आहे. यासंदर्भात, जगन फडणीस लिहितात-''नागपंचमीच्या दिवशी नाग व साप यांना दुध पाजले जाते. ज्या धर्म संस्कृतीत विषारी नाग सापांनाही माणुसकी दाखविली जाते, पण माणूसच असलेल्या आणि हिंदु धर्माचाच घटक असलेल्या दलित समाजाविषयी मात्र माणुसकीचे पाझर आटलेले असतात. समाजात बदल घडवून आणण्याचे शिक्षण हे एक साधन आहे. त्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांनीच दलिताचे डोळे काढावेत. जातीवादी शक्तींचा जोर वाढत आहे त्यामुळे या प्रवृत्ती फोफावत आहेत'' अशा प्रकारे जातीभेदाने पोखरलेल्या अमानवी आणि असत्य मानवी जीवनाच्या संतापजनक दृष्टिकोनाचा प्रत्यय जगन फडणीस यांच्या लिखणातून येतो.

तत्कालीन महाराष्ट्र सरकारने शालेय विदयार्थ्यांसाठी मागासवर्गीय व सवर्ण विदयार्थ्यांना वेगवेगळया रंगाचा गणवेश मोफत देण्याचर निर्णय घेतला होता. या निर्णयावर 'भेदभावाचचा गणवेश' या अग्रलेखामधून मार्मिक शब्दांत टीका केली आहे. ते लिहितात-''ग्रामीण भागात अजून जातीभेद घट्ट मूळ धरून आहे, आणि राखीव जाबा, सवलती या जागृतीपोटी करण्यात आलेल्या हक्कांच्या मागण्या, हक्कांकरिता मागासवर्गात होत असलेली जागृती ही सवर्णांची खरी पोटदुखी आहे. त्यातून मागासवर्गीयांविषयी सवर्णांना तिरस्कार आहे, हा तिरस्कार जोपासणे, वाढविणे आणि आपल्या राजकारणासाठी सवर्णांच्या मतपेटया निर्माण करण्याच्या कुटिल कारस्थानातून विदयार्थ्यां-विदयार्थ्यांत भेदभाव वाढविण्याकरिता दोन प्रकारच्या गणवेशांची महाराष्ट्र सरकारची कल्पना पुढे आली आहे.'' यावरून, मागासवर्गीयांविषयी सवर्णांना असलेला तिरस्कार जोपासण्यासाठी व वाढविण्यासाठी केल्या जाणाऱ्या राजकारणाचा आणि शासकीय धोरणांच्या वापरावर जगन फडणीस यांनी आपल्या अग्रलेखांद्वारा टीका केल्याचे दिसून येते.'मानवतेची हत्त्या' या अग्रलेखामध्ये जगन फडणीस यांनी बिहारमधील जमिनदारांच्या खाजगी सशस्त्र सेनांद्वारं दलित व मागासवर्गीयांच्या केल्या जाणाऱ्या नरसंहाराचे विदारक वास्तव वाचकांसमोर मांडले आहे. ते लिहितात-''बिहारची जमीनदारी पद्धती, बिहारचा जातीवाद बिहारची सामाजिक परिस्थिती यात माणुसकीचा अभाव आहे. जमीनदारांच्या संघटना दलितांना जमीन मागण्याची इच्छाच निर्माण होऊ नये याकरिता दहशत बसवित आहेत. बिहारमध्ये गावेच्या गावे दलित-मागासवर्गीयांची असतात. तेथील जमिनीवर मालकी वरिष्ठ जातींच्या जामीनदाराकडे असते!'' जगन फडणीस यांनी आपल्या अग्रलेखांतून, दलित व मागासवर्गीयांवर केल्या जाणाऱ्या छळ, अन्यायाच्या हिंससक कृतींचा निषेध केल्याचे दिसून येते.

**<u>शोध</u>:-** सामाजिक समानता जोपासली न गेल्यास, समाजामध्ये सामाजिक विषमतेची दरी वाढेल व त्यातून अराजक माजेल ही जाणीव करून देण्याचे काम जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधून झाल्याचे दिसून येते. जगन फडणीस यांनी लोकशाही मुल्यांच्या आधारे सामाजिक समता स्थापित करण्यासाठी लोकांची सद्सद्विवेकबुद्धी जागृत करण्याचे काम आपल्या पत्रकारितेमधून केल्याचे स्पष्ट होते. शिवाय, त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून, जातीभेदास कारणीभूम ठरणाऱ्या धर्मांध राजकारणास विरोध केल्याचेही निदर्शनास येते. जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधील जातीनिर्मुलन विषयक विचारांतून सामाजिक समानतेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आवश्यक असणारी प्रगल्भता, परिपक्वता आणि पारदर्शकता प्रकट होते.

**<u>निष्कर्ष</u>:-**जगन फडणीस यांचे जातीनिर्मुलनविषयक विचार व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या विकासाची वाटचाल करण्यास सहाय्यभूत ठरतात. जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमधून समाजहिताच्या अपेक्षेतून जातीनिर्मुलनाचा प्रचार व प्रसार झाल्याचे दिसून येते. त्यांच्या पत्रकारितेमुळे जातीभेदाची चौकट मोडण्याची वैचारिक तयारी लोकांच्यामध्ये निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. जगन फडणीस यांच्या पत्रकारितेमध्ये समतेच्या विकासाची दिशा निश्चित करणाऱ्या लोकशाही, सामाजिक व राजकीय मुल्यांची प्रचिती येते. मागासवर्गीयांना सन्मानाने व त्यांच्या हक्कांचा उपभोग घेता येईल अशी वागणूक देणे आवश्यक असल्याचे ते दाखवून देतात. शिवाय, त्यांच्या कल्याणासाठीची इच्छाशक्ती जागृत करण्याचे काम जगन फडणीस यांच्या पत्रकारितूेमधून झाल्याचे स्पष्ट होते.

**<u>संदर्भ</u>**:-

1) दैनिक पुढारी (कोल्हापूर) या वृत्तपत्रामधील जगन फडणीस यांचे अग्रलेखः-

| | | |
|---|---|---|
| १. डॉ. आंबेडकरांशी संबंध काय? | - | १७ एप्रिल १९९१ |
| २ संतांची भुमी की सैतानांची? | - | ५ सप्टेंबर १९९१ |
| ३ चातुर्वर्ण्याची चौकट | - | १४ ऑक्टोबर १९९१ |
| ४ कुम्हेरच्या किंकाळया | - | २३ जून १९९२ |
| ५ कागदी घोडे | - | ६ मे १९९३ |
| ६ बाबासाहेबांची खंत | - | ६ डिसेंबर १९९४ |
| ७ जाती श्रेष्ठतव आणि क्रुरता | - | ८ ऑगस्ट १९९५ |
| ८ भेदभावाचा गणवेश | - | ४ जून १९९६ |
| ९ मानवतेची हत्त्या | - | ४ डिसेंबर १९९७ |

2) Berger Arther Asa:- Media and communication research Methods (Page No. 6, 112) (An Introduction) to qualitative and quantitative Approaches)Sage publications, Inc. 2455 Teller Road,Thousand Oates, California 91230.

3) Prof. Panna Kishwar:- Mass Media Research (Page No.3) Himalaya Publishing House, Ramdoot Dr. Bhalerao Marg, Girgaon, Mumbai, 400 004.

4) मुंशीलाल गौतम- लेख.कायदा व सामाजिक न्याय- लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक ऑक्टोबर २००६,